पुण्य नगरी

एन. ई. एस. हायस्कूलमधील कार्यशाळेत सायबर सुरक्षेचे धडे

पारोळा : सायबर सुरक्षेबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती घडवण्यासाठी येथील एन. ई. एस. हायस्कूल आणि एन. ई. एस. माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात सायबर सुरक्षा मार्गदर्शन कार्यशाळा पार पडली.

या सत्रात निमंत्रित तज्ज्ञ, स्वयंसेवक अक्षय पाटील आणि लोकेश पाटील यांनी विद्यार्थ्यांना आधुनिक डिजिटल विश्वातील विविध धोके, वाढते सायबर गुन्हे आणि त्यापासून स्वतःचे व कुटुंबाचे संरक्षण करण्याचे व्यावहारिक उपाय यावर विस्तृत मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचे आयोजन प्राचार्य महेंद्र जोगी, प्राचार्य शरद अहिरे यांच्या मार्गदर्शनात केले होते. या मार्गदर्शन सत्रात दोन्ही विद्यालयांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. या वेळी विद्यार्थ्यांनी विविध शंका, सायबर सुरक्षेशी संबंधित प्रश्न आणि दैनंदिन जीवनातील डिजिटल अडचणी मांडल्यात. त्यांचे स्वयंसेवक अक्षय पाटील व लोकेश पाटील यांनी निरसन केले.

Jalgaon Edition
Aug 12, 2026 Page No. 03
Powered by: erelego.com